# मुंबई विद्यापीठात स्पर्धापरीक्षा संदर्भात अभ्यासक्रम प्रशिक्षण व मार्गदर्शन

भारतीय राज्य घटनेनुसार लोकसेवा आयोगाची स्थापना केली गेली व शासकीय सेवक भरतीची जबाबदारी या आयोगाकडे सुपूर्द करण्यात आली. केंद्र सरकारच्या कक्षेत येणाऱ्या सेवांमध्ये श्रेणी १ व २ चे अधिकारी निवडण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) कार्यरत आहे, तर महाराष्ट्र शासनाच्या सेवामध्ये अधिकारी निवडण्याचं काम महाराष्ट्र लोकसेवा आयोग(MPSC) करतं. या पदांच्या भरतीसाठी आयोग वेगवेगळ्या स्पर्धा परीक्ष्या घेत असतात. या व्यतरीक्त केंद्रीय कर्मचारी चयन आयोग सुद्धा इतर कार्माचारीयांची भर्ती स्पर्धा परीक्षा घेऊन करते.

शालेय तसेच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना या परीक्षांची नीटशी कल्पना नसते या परीक्षा चा अभ्यासक्रम काय असतो? या परीक्षांची तयारी करणारे नवीन विद्यार्थी पॅटर्न समजून घेण्यासाठी बराच वेळ घालवतात .्यामुळे प्रत्यक्ष अभ्यासाला दिशा मिळण्यासाठी वेळ जातो. नेमका अभ्यास कसा करावा ? कोणत्या विषयाला किती वेळ द्यावा? अभ्यासाची सुरुवात कोणत्या विषयापासून करायची? या पदांसाठी वेगळा कोर्स आवश्यक आहे का? अनुभवाची गरज आहे का? पदवी परीक्षेत किती टक्के गुणांची आवश्यकता आहे? या व अशा बऱ्याच प्रश्नांच्या गोंधळात हे विद्यार्थी असतात. याचे कारण म्हणजे महाविद्यालयीन स्तरावर असणारी परीक्षा व ही परीक्षा या दोन्ही भिन्न आहेत. परीक्षांची तयारी करायची मग पूर्ण तयारी व योग्य मार्गानेच व्हायला हवी परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये चिकाटी, जिद्द, मेहनत करण्याची तयारी, नियोजन, सातत्य, याबरोबरच संयम हादेखील गुण असायला हवा. परंतु त्यांना अभ्यास कसा करावा हेच कळत नाही,

याकरिता मुंबई विद्यापीठातील प्रशासकीय व्यासाय अकादमी तर्फे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे . मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी पात्र/ प्राप्त अथवा शेवटच्या वर्षामध्ये असलेले उमेदवार या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात.

असेआढळून आले कि स्पर्धापारीक्षाची तयारी करीत असतना एका छताखाली अभ्यासासाठी दर्जेदार व विस्वसाहार्य साधने/पुस्तके सापडणे कठीण असते. तसेच हे शोधणे सुद्धा बरेच वेळखाऊ व त्रासदायक असते यावर मात करण्यासाठी अकादमीने अनेक दर्जेदार व विस्वसाहार्य साधने पुस्तक व नियतकालिके यांच्या रुपात उपलब्ध करून दिले आहे. या व्यतरीक्त विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू ग्रंथालयात जवळपास १४ लाख पुस्तके व ७०० नियतकालिके व मासिके आहेत. याचा फायदा अकादमी मध्ये प्रवेस घेणारास मिळणार आहे.

विद्यापीठाच्या तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन या अभ्यासक्रमात मिळणार असल्यामुळे इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे विद्यापीठाच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमासाठी अर्जाचे नाममात्र शुल्क ५०० रु. व पूर्व परीक्षेच्या सत्रासाठी शैक्षणिक शुल्क ३००० रु आहे. आर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १०-०६-२०१३ असून प्रवेश परीक्षा दि १६ -०६-२०१३ रोजी आहे. २०१४ च्या स्पर्धा परीक्षेकरिता सत्र सुरवात व वर्ग जुलै २०१३ पासून सुरु होणार आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अंबादास जाधव, प्रभारी संचालक,प्रशाकीय व्यवसाय प्रशिक्षण अकादमी, रूम न. ४, जे पी नाईक भवन, मुंबई विदयापीठ, विद्यानगरी, मुंबई, दूरध्वनी क्रमांक २६५४३५४७/२६५३०२०८ अथवा भ्रमणध्वनी क्रमांक ९८२१६२९६०२ वर सम्पर्क साधावा.

डॉ.अंबादास जाधव

प्राद्यापक प्रभारी संचालक

प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण अकादमी